Historicity Research Journal
Volume 2 | Issue 3 | Nov 2015

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

# तडवळे (क), ता.जि.उस्मानाबाद येथील वतनदार परिषद

**सुशीलकुमार शं सरवदे**

इतिहास विभाग प्रमुख तेरणा , महाविदयालय,उस्मानाबाद.

## प्रास्ताविक

महाराष्ट्राला सामाजिक परिवर्तनाच्या लढयाची महान परंपरा आहे. या लढयाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अतुलनीय योगदान आहे. सामाजीक परिवर्तनास चालना देणारी कसबे तडवळे, ता.जि.उस्मानाबाद येथील महार-मांग वतनदार परिषद महत्वपूर्ण ठरली आहे. "डॉ.बाबासाहेब आंबेउकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ व २३ फेब्रुवारी १९४१ रोजी दोन दिवस महार-मांग वतनदार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते."[१] या परिषदेचे स्वागताध्यक्ष देवीचंद मारुती कदम हे हाते. या परिषदेसाठी सोलापूर जिल्हयातील व मराठवाडयातील येरमाळा, लातूर, उद्गीर, अहमदपूर येथील लोक मोठया संख्येने आले होते.

वतन हे मध्ययुगीन काळातील सामाजीक व आर्थिक संस्था आहे. एखाद्या राजाकडुन कामाच्या मोबदल्यात वतन दिले जात असे. वतनदान असणे समाजात प्रतिष्ठेचे मानले जात असत. वतन म्हणजे वंशपरंपरेने चालत आलेली संपत्ती, अधिकारी व हक्क होय. वतनामध्ये जमीन, हक्क, मान मिळत असे. वतनामध्ये परगणे, गाव व पेठ वतनदान इत्यादी प्रकार होते. गाव वतनदारामध्ये पाटील, कुलकर्णी, चौगुला, गुरव जोशी, सुतार, परीट, चांभार, महार मांग, लोहार, सोनार, कोळी, धनगर, तांबोळी, कोष्टी, माळी, मुलाना इत्यादीचा समावेश होता. त्यापैकी महार व मांग गाव वतनदार होते. "गावाची राखण व साफसफाई करणे हे त्यांचे प्रमुख काम होते. तसेच महसुल सरकारी दरबारात पोहचविणे, सरकारी अधिकाऱ्याची सेवा करणे, मेलेली जनावरे गावाबाहेर ओढुन नेऊन टाकणे इत्यादी काम त्यास करावी लागत होती"[२]

## तडवळा येथील वतन, वतनदार व त्यांची कामे :-

कसबे तडवळे येथे "महार वतनासाठी गावच्या दक्षिणेस तेरणा नदीच्या काठावर ६४ एकर व दुधगावच्या शिवारात १० एकर जमीन आहे. ही जमीन महार शेतकरी करीत असत"[३] शेतीमधुन निघालेले उत्पन्न चावडीत आणून त्यांचे १६ हिस्से करुन आपआपसात वाटुन घेत अस. काशिनाथ सोणावणे, तात्या निकाळजे मरिबा भालेराव, यशवंत सोनवणे हे त्या काळातील कार्यकर्ते होते. त्यापैकी मध्यल्या गल्लीचे मरीबा भालेराव त्यांचे मामलेदारासोबत चांगले संबंध होते. त्यांनी स्वत:च्या गल्लीसाठी चारआने वतन जास्त घेतले होते. त्यामुळे दुसऱ्याचे मिळकतीचे उत्पन्न कमी झाले. आपल्या वतनासाठी प्रत्येक गल्लीत भांडण उफाळुन येत असत. परिणामी एक गल्ली दुसऱ्या गल्लीला शत्रुसारखी मानू लागली. "एकमेकांच्या लग्न कार्याला न जाणे, त्यांच्या आडावर दुसऱ्याला पाणी भरु देणे अशाप्रकारे त्यांची आपआपसातील भांडणे विकोपाला गेली होती."[४] वतनामुळे महार समाजाचे ऐक्य दुभंगले होते.

महार वतनदारास सरकारी व खाजगी कामे करावी लागत होती. दररोज पाटील, कुलकर्णी यांची विविध कामे करावी लागत असत. गावातील मेलेले जणावरे गावाबाहेर ओढुन नेऊन टाकणे, प्रेतांची लाकडी टाकणे, जनावरे राखणे, गावाची राखण करणे, गावाची साफसफाई करणे, लाकडे फोडणे, इ.काम कमी मोबदल्यात करावी लागत होती. "महार वतनासाठी दोन आणे व आठ पैसे प्रत्येकी गल्लीस मिळत होते असत"[५]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आगमन व स्वागत :-**

कसबे तडवळे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे दि. २२/०२/१९४१ रोजी बार्शीहुन रेल्वेने सकाळी १०.०० वाजता आगमन झाले होत. "रेल्वेचा क्रमांक एफ-७१२ कोच क्रमांक २६१ असा होता. त्यांच्या सोबत बार्शीहुन नगराध्यक्ष मराणकर, शंकरराव झाडबुके व शांताराम उपथ्याम इत्यादी मंडळी होती"[६] रेल्वेस्टेशनवरुन सजविलेल्या पन्नास बैलगाडीच्या गाडीतुन, दोन्ही बाजुनी सुशोभित केलेल्या रस्त्याहुन, समता दल तरुण मंडळाच्या संरक्षणाने त्यांनी व्यासपिठावर आणण्यात आले होते. प्रथम पाच सुवासिनीकडुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना ओवाळण्यात आले होते. त्यामध्ये रहिबाई लाला सोनवणे, वंचला दत्तु सोनवणे, शारदा भगवान भालेराव, हौसाबाई यादव सोनवणे व लिलाबाई अर्जुन सोनवणे या स्त्रियांचा सहभाग होता. त्यांच्या स्वागतासाठी श्रीमंत पाटील, शंकर दडपे, शंकरराव निंबाळकर, केशवराव पाटील, बाबूराव देशपांडे, दगडु पाटील इत्यादी पुरागामी मंडळी होती. तसेच त्यांची या परिषदेसाठी मदत झाली होती. "त्यावेळीच अस्पृश्यासाठी गावालगतच्या शेतातील विहीर खुली केल्याचे जाहीर करण्यात आले होते"[७] तसेच महार व मांग यांच्या वस्तीत जागा अपुरी पडत असल्याने श्रीमती रंगूबाई रंभाजी पाटील, यांनी स्वत:ची जमीन दान दिली होती. या परिषदेसाठी आमदार जे.एस.ऐदाळे, हरिभाऊ तोरणे, काशिनाथ मारुती सोनवणे, अर्जुन हरि भालेराव, भगवान भालेराव, भागप्पा सोनवणे, नाथा भालेराव, शिवाजी भालेराव, मरिबा भालेराव, यशवंत भालेराव, सदाशिव भालेराव, पंढरी निकाळजे इत्यादींनी पुढाकार घेतला होता.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषण :-**

कसबे तडवळे येथील वतनदार परिषदेत बोलताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महार वतनदाराकडुन विनावेतन काम करुन घेतल्यामुळे, त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. त्यांना जमिनी, गायराण जमीनी व पगार मिळवुन देण्याचा तसेच निझ्ााम संस्थानातील महार व मांग यांच्या उपजिवीकेसाठी पगार व जमिनीची निझामाकडे मागणी करुन, प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीन असे सांगितले होते. त्यांनी यावेळी राष्ट्रीय कॉंग्रेसवर टिका केली होती. अस्पृश्यांनी आपली मुले शिकवली पाहिजेत. शिक्षणानेच समाजाचा उध्दार होणार आहे. जुनी काम सोडुन द्या. अन्याचा प्रतिकार करा असे सांगितले होत. "हिंदु लोकांचा कैवार घेवुन, त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी इ.स. १८८५ साली कॉंगेसची स्थापना झाली आहे. सुरुवातीस मुंबई व पुण्याच्या पुढाऱ्यांनी उठावे व ठराव करावे अशी कॉंग्रेसची कामगिरी होती"[८] त्यांनी महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली काम करण्याऱ्या कॉंग्रेसवर व हरिजन सेवक संघावरही टिका केली होती. त्यांनी अस्पृयांना पाणी पाजावयाचे असेल तर समतेने पाजा. आम्हाला विषमता नष्ट करावयाची आहे. महात्मा गांधीजींना हिंदु कलेक्टर व गर्व्हनर पाहिजे मग अस्पृश्य का नसावा? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी अशा धावपळीच्या परिस्थितीत आपला निभाव लागणार नाही. आपल्याला मानाने जगायचे असेल तर राजगीय सत्ता हाजी आली पाहिजे. महार वतनाचा लोभ किती दिवस धरायाचा? महार वतनदाराच्या पोटाचा प्रश्न सुटला नाही. प्राथमिक शिक्षणाची सोय झाली नाही. सकारी जमिन पडिक असून, अस्पृय लोक उपाशी आहेत "तेव्हा अस्पृश्यांनी संघटन करुन, सनदशीर मार्गाने शासनाच्या नजरेस आणून द्यावे असे सांगितले होते"[९]

निझाम संस्थानातील महार व मांग वतनदाराची स्थिती सारखीच होती. भारतातील अनेक संस्थानापैकी निझामाचे राज्य पहिल्या दर्जाचे आहे. त्या मानाने बडोदा राज्य लहान आहे. परंतू या संस्थानाने अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय केली आहे. "म्हैसुर संस्थानामध्ये अस्पृश्यंना जमीनी मिळाल्या आहेत. त्या संस्थानात त्यांच्या हिताकडे लक्ष दिल्याचे दिसुन येते"[१०] त्याप्रमाणे हैद्राबाद संस्थानात झाले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कसबे तडवळे येथील महार-मांग वतनदार परिषदेमध्ये त्यांच्यावर होणाऱ्य अन्यायाला वाचा फोडली होती.

**वतनदार परिषदेतीत ठराव :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर याची भाषण झाल्यावर तीन ठराव घेवुन, पास करण्यात आले आहे.

१- निझाम सरकारच्या हद्दीतील वतनदार महार, मांग लोकांनी करावी लागणारी कामे लक्षात घेता त्यांना सरकारकडुन योग्य मोबदला मिळत नाही. तरी सरकारी जंगलाच्या जमिनी देवुन, त्यांच्या पोटाचा प्रश्न मिटवावा.

२-निझाम हद्दीत राहणाऱ्या अस्पृश्य लोकांची हेळसांड होत आहे. तरी सरकार तर्फे त्यांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय त्वरीत करण्यात यावी.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

३-नविन होणाऱ्या राज्यघटनेत निझाम हद्दीतील अस्पृश्य जनतेला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावे"[११]

**सन्मीत्र तरुण संघ वाचनालयास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भेट :-**

सन्मीत्र तरुण संघ वाचनालय कसबे तडवळे येथे कार्यान्वित होते. वाचलनायाचे अध्यक्षा पारुबाई एकनाथ सोनवणे या होत्या. त्यांनी स्वत:च्या घरावरील पत्रे वाचनालयास दान दिले होते. केशवराव पाटील यांनी विटा व माती दिली. येथील परिषदेच्या वेळेस सन्मीत्र वाचनालयास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिली होती. "त्यांना वाचनालयात मासिक, वर्तमानपत्र व पुस्तके आहेत. थोडयाच दिवसात वाचनालयाची भरभराट होवो व सर्व व्यवस्था पाहुन समाधान वाटले. अशी लेखी प्रतिकिया देवुन, सही केलेली आहे"[१२] तसेच वाचनालयास इमारत बांधण्यास सांगितले होते.

इंग्लंडमध्ये झालेली इ.स. ९३१ च्या व्दितीय गोलमेज परिषदेत डॉ.बाबासाहेब आंबेउकर यांनी दलितासाठी काही जागा राखीव करण्याची मागणी केली. तेव्हा महात्मा गांधीजीनी विरोध केला होता. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्यांचे खरे प्रतिनिधी नसूर, महात्मा गांधी आहेत. अशा आशयाचा लेखी तारा अस्पृश्य लोकाकडुन स्वत: गांधीजीनी पाठविल्या होत्या. तेव्हा भारतातून डॉ.आंबेडकर हे अस्पृश्याचे नेते आहेत अशा आशयाच्या बऱ्याचा लेखी तारा इंग्लंडला पाठविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये "कसबे तडवळे येथील लाल कोंडीबा सोनावणे यांनी महार मांग वतनदार परिषदेच्या वतनी इंग्लंडला तार पाठविली होती"[१३.]

इ.स. १९४६ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. त्यांनी जनता वर्तमानपत्रातुन सत्याग्रहाची मागणी केली होती. तेव्हया या "आंदालनात कसबे तडवळे येथील वीस लोकांनी सहभाग घेतला होत. नाथा भालेराव, शिवाजी सखाराम भालेराव, चोखा मरिबा भालेराव, यशोदाबाई भालेराव, कस्तुराबाई सोनवणे, बनाबाई माणिक भालेराव इत्यादी लोक सत्यागृहासाठी तयार झाले होते. "[१४] यशोदाबाई भालेराव, कस्तुरबाई सोवनणे व शिवाजी सखाराम भालेराव हे सत्याग्रही दोन महिने तुरुंगात होते ते सुटुन आल्यानंतर त्यांचा कसबे तडवळे येथे सत्कार करण्यात आला होता.

कसबे तडवळे गावापासुन ०३ कि.मी.अंतरावर दुधगाव हे गाव आहे. तेथिल पोलीस पाटलाचे पद रिक्त झाले होते. त्यासाठी कसबे तडवळे येथे येथील नाथा भालेराव यांनी अर्ज केला होता. त्यामुळे त्यांची दुधगावचा पोलीस पाटील म्हणून नेमणुन करण्यात आली होती. "नाथा भालेराव हे महार जातीचे पोलीस पाटील इ.स १९३९ ते १९५६ या काळात होते"[१५] कसबे तडवळे येथील ग्रामपंचायतीची निवडणूक इ.स. १९४६ साली झाली होती. तेव्हा या निवडणूकीत "शिवाजी भालेराव यांनी बिनबिरोध निवड करण्यात आली होती. "[१६.]

**उपसंहार**

कसबे तडवळे येथील झालेल्या महार-मांग वतनदार परिषदेमुळे परिवर्तनास चालना मिळाली होती. त्यामुळे अस्पृश्य लोक नवीन आशा बाळगुन वाटयाला करु लागला. आपण कुणाचे गुलाम नाहीत, शिक्षणामुळे दारिद्रय जाते. झाडुन काढणे, मेलेली जनावरे गावाबाहेर नेवुन टाकणे, लाकडे फोडणे व प्रेताची लाकडे टाकणे इत्यादी कामे करण्याचे बंद केले. कसबे तडवळे येथील गावकीच्या वतनासाठी होणारी भांडणे बंद होवुन ते एकमेकांच्या जवळ आले. सामाजिक ऐक्याची त्यांना चालना मिळाली. राजकीय जागृती घडुन आली. परिणामी सामाजिक, आर्थिक राजकीय, सांस्कृतीक व शैक्षणिक परिवर्तनास चालना मिळाली होती.

**संदर्भ सुची**

१. दैनिक सुराज्य दि. १४/०४/२००९, उस्मानाबाद पृ.२
२. भगवान भालेराव, परिस्पर्श, जयंती ऑफसेट, सोलापूर प्रथम आवृत्ती २००७ पृष्ट ०४
३. उपरोक्त पृष्ट ०७.
४. उपरोक्त पृष्ट ०८.
५. उपरोक्त पृष्ट ०७.
६. दैनिक सुराज्य, पूर्वोक्त पृष्ट क्र. १३.
७. उपरोक्त क्र. १३.

८. डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखाण आणि भाषणे, खंड-८, भाग-०२, प्रथमावृत्ती २००२, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन पृष्ट-३६७.
९. उपरोक्त पृ . ३६७.
१०. उपरोक्त पृ . १६९.
११. उपरोक्त पृ. ३७०.
१२. भगवान भालेराव, पुर्वोक्त क्र. १२ पृ.५८.
१३. दैनिक सुराज्य, पुर्वोक्त क्र.१३
१४. भगवान भालेराव, पुर्वोक्त क्र. १२ पृ ६३
१५. उपरोक्त पृ.३०
१६. उपरोक्त पृ. ३५.